**METS Institute of Pharmacy celebrates Independence Day with Social Responsibility**

Social Welfare Cell of the institute celebrated the Independence Day 2018 by various activities. A guest lecture on the topic “War Stories” by Rtd. NAVY officer Mr. Bhupinder Kumar was organized during which he addressed the students and explained the contribution of Armed forces during the wars country faced. He went on to appeal the youth to become responsible citizens of India.

Student Volunteers went on to celebrate Independence Day with children of Orphan age home, School for Deaf students.

SWC donated blankets to the Kings Foundation orphan age home

Hearing cum teaching aid equipment was donated to the Jagruti school for deaf students, Makhmalabad

In another activity Books were donated to the AT Pawar residential school located at Borgad, Nashik

**मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी भुजबळ नॉलेज सिटीतील विद्यार्थ्यांचा सामाजिक बांधिलकीतून स्वातंत्र्यदिन साजरा**

मेट्स भुजबळ नॉलेज सिटीतील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील सोशल वेल्फेअर सेल तर्फे स्वातंत्र्यदिना निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय नौदलाचे निवृत्त अधिकारी श्री. भूपिंदेर कुमार यांनी विद्यार्थ्यांना भारतीय इतिहासातील युद्धांचा दाखला देवून विविध सैन्य दलांचे योगदानाची माहिती सांगितली. भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना अभिप्रेत असणाऱ्या भारतामध्ये तरुणांची काय जबादारी असावी याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या ध्वजारोहण कार्यक्रमानंतर महाविद्यालातील विद्यार्थ्यांनी शहरातील काही आश्रम शाळा आणि अनाथ आश्रमांमध्ये जावून मिठाई आणि शालेय वस्तूंचे वाटप केले.

- बोरगड येथील ए.टी. पवार आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे आणि शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले.
- मखमलाबाद येहतील जागृती कर्णबधीर निवासी विद्यालयात लूप इंडक्षण मशीन या कर्णबधीर मुलांच्या शालेय उपकरणाचे वितरण करण्यात आले.
- आणखी एका उपक्रमा अंतर्गत महाविद्यालयातील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी किंग्स फौंडेशन ज्ञानदीप गुरुकुल आधाराश्रम येथे ५० विद्यार्थ्यांना ब्लँकेट वाटप करण्यात आले.

सदर उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले तसेच सर्व कर्मचार्यांच्या सहकार्य आणि पुढाकाराने शहर व परिसरातील उपेक्षित विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या या सर्व उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सदर कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. पवन उदावंत यांनी केले.





ज्ञानदीप गुरुकुल आधाराश्रम येथे विद्यार्थ्यांना ब्लँकेट वाटप




ए.टी. पवार आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे आणि शालेय वस्तूंचे वाटप





स्वातंत्र्य दिनाबद्दल व्याख्यान सदर करतांना भारतीय नौदलाचे निवृत्त अधिकारी श्री. भूपिंदेर कुमार




जागृती कर्णबधीर निवासी विद्यालयात लूप इंडक्षण मशीन या कर्णबधीर मुलांच्या शालेय उपकरणाचे वितरण